। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ४८ वा । शुक्रवार दिनांक २४ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## तोंडाच्या कर्करोगाविरुद्ध जनजागृतीची गरज अधोरेखित

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण कार्यक्रम संपन्न

धाराशिव (जिमाका)- तोंडाच्या कर्करोगाचे लवकर निदान करणे व तंबाखू सेवन टाळणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत फक्त हास्य नव्हे,तोंडाच्या कर्करोगाविरुद्ध लढा (Beyond the Smile, Combating Oral Cancer) या विषयावर दि.१५ एप्रिल २०२६ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव येथे सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (Continuing Medical Education (CME) कार्यक्रम उत्साहात पार पडला.

भारतात तोंडाचा कर्करोग हा अत्यंत धोकादायक,परंतु योग्य वेळी प्रतिबंध करता येण्याजोगा गंभीर आजार म्हणून समोर येत आहे. चिंताजनक बाब म्हणजे या आजाराची सुरुवातीची लक्षणे अनेकदा दुर्लक्षित राहतात.तंबाखू सेवनाशी संबंधित असल्याने या आजाराचे प्रमाण वाढत असल्याचे जागतिक पातळीवरील तज्ज्ञांनी नमूद केले आहे. नियमित मौखिक तपासणी,तोंडाची स्वच्छता राखणे आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळणे हे कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले.या उचए कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य कर्मचाऱ्यांना अद्ययावत माहिती देणे आणि तोंडाच्या कर्करोगाबाबत व्यापक जनजागृती करणे या उद्देशाने करण्यात आले होते.

कार्यक्रमास डॉ.महेंद्रकुमार धाबे (उप-अधिष्ठाता PG व विभागप्रमुख, जीवरसायनशास्त्र),डॉ.शफीक मुंडेवाडी (उप-अधिष्ठाता UG व विभागप्रमुख,शरीरक्रियाशास्त्र), डॉ. तानाजी लाकाळ (वैद्यकीय अधीक्षक), ID- चे अध्यक्ष डॉ.प्रतिक शेटे,IM-Women's Wing अध्यक्षा डॉ. कौशाली राजगुरु तसेच कार्यक्रमाचे आयोजक डॉ.नागेशनाथ वाघमारे (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, दंतरोगचिकित्सा) यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमासाठी राज्यातील नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांनी व्याख्याने दिली.यामध्ये कोल्हापूर कॅन्सर सेंटरचे डॉ.मारुती वाडेवाले,चांडक कॅन्सर सेंटर,जळगाव येथील डॉ. विजया गुरुडे,मंदाडे कॅन्सर सेंटर, लातूरचे डॉ.अर्जुन मंदाडे तसेच ऑन्कोसर्जन डॉ.महेश काळे,डॉ. नामदेव सुर्यवंशी आणि डॉ.लगदीर गायकवाड यांचा समावेश होता.

कार्यक्रमात तोंडाच्या कर्करोगाची कारणे,वाढता प्रादुर्भाव,तोंडातील लाल व पांढऱ्या चट्ट्यांकडे होणारे दुर्लक्ष,आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केले जाणारे अचूक निदान आणि त्यावरील अत्याधुनिक उपचार पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

तोंडाच्या कर्करोगाबाबत भारतात अधिक व्यापक जनजागृतीची आवश्यकता असल्याचे सांगताना अधिष्ठाता डॉ. चौहान यांनी आरोग्य सेवकांची जबाबदारी अधोरेखित केली.रुग्णांचे लवकर निदान करणे, त्यांना जागृत करणे आणि वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे हे प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्याचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.लवकर निदान व आधुनिक उपचारांमुळे रुग्णांवरील गंभीर परिणाम कमी करता येतात आणि अनेकांचे जीवन वाचवणे शक्य होते,असे त्यांनी स्पष्ट केले.

## धाराशिव जिल्हा पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- भुम पोलीस ठाण अंतर्गत संतोष वय ४७ वर्षे, रा.वालवड ता. भुम जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी जनावरांच्या बाजारतळ वालवड येथे अंदाजे १,५०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत दिपक जालिंदर वय ४२ वर्षे, रा.निबोडी अहमदनगर ह.मु काशी गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी काशीद गल्ली मोकळे जागेत झाडाखाली परंडा येथे अंदाजे ६,००० किंमतीची ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

लोहारा पोलीस ठाण अंतर्गत नामे विजय वय २२ वर्षे, रा.गवंडी प्लॉट लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी बसस्थानक पाईमागे लोहारा बु येथे अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर अशोक वय ६५ वर्षे, रा.जेवळी ता. उत्तर लोहारा जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी १३.४० वा. सु. आपल्या राहत्या घराचे समोर मोकळ्या जागेत जेवळी उत्तर येथे अंदाजे १,८०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली तर सोपान वय ४२ वर्षे, रा.सास्तुर ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.२२.०४.२०२६ रोजी सास्तुर ते मुर्शदपुर रोडवर युवराज बियर शॉप समोर अंदाजे १,०४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## शेतकऱ्यांच्या विकासाला गती : कर्जमुक्ती,ई-नाम व संगणकीकरणातून नवी ताकद

* ४४ हजार ७३९ शेतकऱ्यांना १३० कोटी ७७ लाखांचा प्रोत्साहनपर लाभ
* ई-नाम योजनेमुळे शेतमालाला मिळतोय अधिक दराचा बाजार
* ५७ हजार ५६ शेतकऱ्यांना ७.२८ कोटींचा व्याज सवलत लाभ
* २०१ सहकारी संस्थांमध्ये उडउ कार्यान्वित; डिजिटल व्यवहारांना चालना

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासन विविध योजनांच्या माध्यमातून सातत्याने भक्कम पाठबळ देत आहे.कर्जमुक्तीपासून ते डिजिटल बाजारपेठेपर्यंत आणि सहकारी संस्थांच्या आधुनिकीकरणापर्यंत अनेक उपक्रमांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडताना दिसत आहेत. या सर्व योजनांचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसोबतच त्यांच्या आत्मविश्वासातही भर पडत आहे.

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत अल्पमुदत पिककर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४७ हजार ४२० लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून त्यापैकी ४६ हजार ६१९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे.यापैकी ४४ हजार ७३९ शेतकऱ्यांना तब्बल १३० कोटी ७७ लाख रुपयांचा लाभ देण्यात आलेला आहे.

दरम्यान,शासनाच्या ९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सक्षमीकरणासाठी या समितीच्या आतापर्यंत ६ बैठका झाल्या असून कर्जाच्या थकबाकी वसुलीसाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्येही आधुनिकतेचा वेग वाढत आहे.एकूण ९ बाजार समित्यांपैकी कळंब व मुरूम येथे ई-नाम योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून ऑगस्ट २०२३ पासून तुळजापूर व उमरगा येथेही ही योजना कार्यान्वित झाली आहे.

यामुळे धाराशिव जिल्हा राष्ट्रीय कृषी बाजाराच्या ऑनलाईन नेटवर्कमध्ये समाविष्ट झाला असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी अधिक चांगला दर मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. उर्वरित बाजार समित्यांचा समावेश करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत सन २०२५-२६ साठी जिल्हा नियोजन समितीकडून ४ कोटी रुपये व शासनाकडून ३.३३ कोटी रुपये असा एकूण ७.३३ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे.या निधीतून सन २०२३-२४ मधील प्रलंबित व २०२४-२५ मधील प्राप्त प्रस्तावांच्या आधारे जिल्ह्यातील ५७ हजार ५६ शेतकऱ्यांना ७.२८ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

सहकार क्षेत्रातही डिजिटल क्रांती होत आहे.जिल्ह्यातील ४६९ विकास संस्थांपैकी १५६ संस्थांचे संगणकीकरण पूर्ण होऊन त्यांना श-झ-उड म्हणून घोषित करण्यात आले आहे.सर्व संस्थांत ऑनलाईन व्यवहार सुरू झाले असून दैनंदिन नोंदी डिजिटल पद्धतीने घेतल्या जात आहेत. याचबरोबर २२१ संस्थांनी ऊेप ड्शीींळलश उशपींशी (उडउ) साठी नोंदणी केली असून त्यापैकी २०१ केंद्रे कार्यान्वित झाली आहेत.

या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील शेतकरी अधिक सक्षम,स्वावलंबी आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल करत असल्याचे दिसून येत आहे.

## समाज कल्याणची माणुसकीची साथ : शिक्षण, आधार आणि न्याय देत घडवत आहे उज्ज्वल भविष्य

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**महाराष्ट्र शासन**

* ॲट्रॉसिटीच्या १८१ पीडितांना २ कोटी ४९ लक्ष रुपये वाटप
* स्वाधारचा १३४८ विद्यार्थ्यांना लाभ
* शिष्यवृत्ती योजनेचे ६१०२ विद्यार्थ्यांना ९ कोटी ७८ लक्ष रुपये वितरीत

धाराशिव (जिमाका) समाजातील वंचित,गरजू आणि विशेषतः अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय धाराशिव यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने करण्यात येत आहे. शिक्षण, आर्थिक सहाय्य,निवास व्यवस्था आणि न्याय मिळवून देण्याच्या माध्यमातून समाज कल्याण विभाग केवळ योजना राबवत नाही, तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरत आहे.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय धाराशिव या कार्यालयामार्फत जिल्हयामध्ये सन २०२५-२६ मध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थी व इतर लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे योजनानिहाय लाभ देण्यात आलेला आहे.

धाराशिव जिल्हयामध्ये अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अर्थात ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत खून प्रकरणातील एकूण ९ पिडितांच्या वारसांना गट-ड या संवर्गामध्ये शिपाई, मदतनीस,पहारेकरी,सफाईगार इ.पदावर कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयामध्ये शासकीय नोकरी देण्यात आलेली असून याद्वारे त्यांचे कुटुंबियांचे अंशतः दुख दुर करण्याचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात आलेला आहे. तसेच या कायद्याअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये गुन्ह्याच्या स्वरूपानुसार १८१ लाभार्थ्यांना रक्कम २ कोटी ४९ लक्ष ५८ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आलेले आहे.

या उपक्रमांमधून केवळ आर्थिक मदतच नव्हे,तर अन्यायग्रस्त कुटुंबांना मानसिक आधार देण्याचा आणि त्यांना पुन्हा उभे राहण्याची संधी देण्याचा संवेदनशील प्रयत्न दिसून येतो.

जिल्हयामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांसाठी एकूण ११ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये ७३९ विद्यार्थी प्रवेशित आहेत.ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेअंतर्गत लाभ देण्यात आलेला असून त्यामध्ये अभ्यासक्रमानुसार ४० हजार ते ४८ हजार रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात आला आहे.सन २०२५-२६ मध्ये एकूण १३४८ विद्यार्थ्यांना ७ कोटी ८१ लक्ष २३ हजार रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे.विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचणी अडथळा ठरू नयेत,यासाठी स्वाधार योजनेच्या माध्यमातून दिले जाणारे हे सहाय्य अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देणारे ठरत आहे.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील एकूण ६१०२ विद्यार्थ्यांना ९ कोटी ७८ लक्ष ९३ हजार २४३ रुपयांचा लाभ देण्यात आलेला आहे. ही शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या स्वप्नांना पंख देणारी ठरत असून,अनेक विद्यार्थ्यांना आपले करिअर घडविण्याची संधी उपलब्ध करून देत आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्यात ३ शासकीय निवासी शाळा कार्यरत असून त्यामध्ये इयत्ता ६ वी ते १० वी चे एकूण ४१९ विद्यार्थी शिक्षण घेत आहे.या विद्यार्थ्यांना निवास,भोजन,शैक्षणिक साहित्य व इतर सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.या निवासी शाळांमुळे ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना सुरक्षित,शिस्तबद्ध आणि सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण मिळत आहे.

समाज कल्याण विभागाच्या या विविध योजनांमधून शिक्षण,संरक्षण आणि सक्षमीकरणाचा त्रिसूत्री दृष्टिकोन दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि गरजू कुटुंबांना मिळणारा आधार हा समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

## आमदार कैलास पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर, पंचनामे करण्याचे दिले आदेश



धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव तालुक्यातील बावी, धारूर या ठिकाणी मंगळवारी गारपीटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्याची पाहणी आमदार कैलास पाटील यांनी केली. केळी, आंबा बागा ,ज्वारी व इतर पिकांच प्रचंड नुकसान झाले असून बाधित शेतीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना आ.पाटील यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात झालेल्या बदलामुळे जिल्ह्याभरामध्ये अनेक ठिकाणी गारपीठ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.तर काही ठिकाणी गारपीठ होऊन पिकांचे नुकसान होत आहे. अशाच प्रकारे मंगळवारी झालेल्या गारपिटीमुळे धाराशिव तालुक्यातील धारूर,बावी, खामसवाडी यासह कळंब येथील देवळाली, कोल्हेगाव, ढोराळा आदी परिसरामध्ये गारपिठीने अक्षरशः शेतकऱ्याचे पिक वाया गेलेले दिसत आहे. या गावांमध्ये आमदार कैलास पाटील यांनी भेट देऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली शिवाय या ठिकाणी लवकरात लवकर पंचनामे करून मदत करण्याचे आदेश पाटील यांनी दिले आहेत. यावेळी पाटील यांनी पिकांचा उत्पादन खर्च हा कित्येक लाखात असतो व मिळणारी मदत ही अत्यंत तुटपुंजी असून त्याने शेतकऱ्याचे नुकसान कसंच भरून येत नाही. मदत वाढवून देणे अपेक्षित आहे पण किमान आहे ती मदत तरी वेळेत मिळावी अशी अपेक्षा आमदार पाटील यांनी सरकारकडे केली आहे. शेतकरी अत्यंत धाडस करून वेगळे प्रयोग करून अशा पिकांची लागवड करतो त्यावेळी नैसर्गिक आपत्तीमुळे त्याच्यावर आलेले मोठे संकट दूर करणे हे सरकारचं कर्तव्य आहे. अन्यथा शेतकरी अशा प्रकारचे पीक घेण्याचे धाडस करणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम सरकारने करावे अशी अपेक्षाही आमदार पाटील यांनी सरकारकडे केली आहे. यावेळी तहसिलदार मृणाल जाधव, तालुका कृषी अधिकारी राहुल दिवाणे, उप अभियंता प्रकाश मोरे, शिवसेनेचे अंकुश मोरे, गजेंद्र जाधव,. बालाजी गुरव, धारुरचे सरपंच बालाजी पवार यांच्यासमवेत शेतकरी बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## क्राईम न्युज

### लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणेअंतर्गत एका गावातील २९ वर्षीय मुलगी दि.१४.०६.२०२४ रोजी हिस गावातील एका तरुणाने लग्नाचे अमिष दाखवून लॉजवर घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. पुन्हा लग्नाचा विषय काढला तर तुला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२१.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-६४,११५(२), ३५१(२),३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### केबल,तांब्याचे वायर व एम सी बीची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. २२.०३.२०२६ रोजी पुर्वी नळदुर्ग बॅरेज क्र ०१ येथुन सप्लाय केबल, पॅनेल मधील तांब्याचे वायर व एम सी बी असे एकुण १,२०,२३६ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रसाद वळवंतराव कांबळे, वय ४६ वर्षे, रा. रावळ गल्ली तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### यात्रेतून मोटारसायकलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गोकुळ धोंडीबा कराळे, वय ५१ वर्षे, रा. चिंचपुर ढगे ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल पखरुड यात्रेत भैरवनाथ मंदीरजवळून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गोकुळ कराळे यांनी दि.२२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पॅन्टचे खिशातील ४३,५०० रु चोरली

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी निलेश विष्णुदास मालपानी, वय ३६ वर्षे, रा. बालाजी मंदीर मारवाडी गल्ली कळंब ह.मु. साई नगर परळी रोड कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२१.०४.२०२६ रोजी बसस्थानक कळंब येथे कळंब धाराशिव बस मध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून निलेश मालपानी यांचे पॅन्टचे खिशातील एकुण ४३,५००रोख रक्कम चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-निलेश मालपानी यांनी दि.२२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारतीयांना परांपरीक पद्धत सोडता येणार नाही

जगात भारताची संस्कृती सर्वश्रेष्ठ होती व आहे. भारतीय व्यापाऱ्याचा संबंध जगाशी होता. धाराशिव जिल्ह्यातील संत गोरोबा काकाचे स्थान तेर येथील व्यापाऱ्यांचा संबंध परदेशाबरोबर होता. इराण-ईराक, पाकिस्तान या ठिकाणी हिंदुसंस्कृती होती. भारत ही सोन्याची चिडीया होती म्हणून वास्का-द-गामा याने भारताचा समुद्र मार्ग शोधला, भारताचा मुळ इतिहास अनेकांना माहिती नाही, तो लपविला गेला आहे. नष्ट केला आहे. आज सारखी प्रगत माहिती व तंत्रज्ञान त्याकाळी नव्हते म्हणून काही बाबी लिहून ठेवल्या नाहीत. जतन करता आल्या नाहीत. हे मान्यच केले पाहिजे. मुळात आपल्या देशाची संस्कृतीला तोड नाही. पुर्वी जसे अनेक भारतीयांकडे मुत्स्यद्दी बुदीमत्ता होती, प्रत्येक क्षेत्रात ज्ञान व विज्ञानाला धरून काम होत होते. पावसाचा अचुक अंदाज असो किंवा शेतीत भरघोष पिक घेण्याची क्षमता असो ती भारतीय शेतकऱ्यात होती. अनेक शोध भारतीयांनी लावले, जगाशी व्यापाऱ्याचा संबंध भारतीय व्यापाऱ्यांशी होता. मुंबई ही मराठी माणसाच्या व्यापाऱ्याचे केंद्र बिंदु होते. जर इतिहासाचा शोध घेतला तर अनेक बाबी कळून येतील. भारतीयांत परदेशिय मालाचे वेड लागले आहे. स्वदेशी मालाकडे दुर्लक्ष केले जाते. परदेशिय मालाचे आकर्षन वाढते होते. कितीही भारतीय बनावटीचा माल असाला तरी परदेशिय मालाची आवड कमी झाली नाही. भारतीय शेतकऱ्यासाठी वरदान ठरणारी गाय आहे. हीचे महत्व सर्वाधिक आहे. शेतीसाठी बैल असो किंवा तीच शेंणखत असो लाख मोलाचा आहे. त्यामुळे मानवीय आरोग्यावर कोणताही दुष्परीनाम होत नाही. आता पशुधनच उरले नाही. अनेकांनी पशुधन विकले. गोधन पाळणे अशक्य असल्याने सोडून दिले. याचा परिणाम शेतीवर होत आहे. रासायनिक खत परवडणारा व आरोग्यास धोकादायक आहे. हे काही सांगण्याची गरज नाही. शेंणखत नसल्ययाने रासायनिक खत परदेशातून मागवावा लागत आहे, तोही आता मिळत नाही कारण मध्य पूर्वेतील युद्धाचे पडसाद आता भारताच्या खत पुरवठ्यावर होऊ लागलेत. भारत एकाच टेंडरमध्ये २५ लाख मेट्रिक टन युरिया आयात करणार आहे. विशेष म्हणजे याची किंमत २ महिन्यापूर्वी दिलेल्या किंमतीपेक्षा जवळपास दुप्पट झाली आहे. माहितीनुसार, इंडियन पोटाश लिमिटेडने या खरेदीची डील फायनल केली आहे. यापैकी १५ लाख टन युरिया पश्चिम किनारपट्टीवर वितरणासाठी सुमारे ९३५ डॉलर प्रति टन दराने तर १० लाख टन युरिया पूर्व किनारपट्टीवर वितरणासाठी ९५९ डॉलर प्रति टन दराने खरेदी केला जाईल. जर मागील २ महिन्यापूर्वीच्या किंमतीची तुलना केली तर पहिल्या टेंडरमध्ये किंमती खूप कमी होत्या. त्यावेळी पश्चिमी किनारपट्टीसाठी जवळपास ५०८ डॉलर आणि पूर्व किनारपट्टीसाठी ५१२ डॉलर प्रति टन दर युरिया खरेदी करण्यात आला होता. म्हणजे अवघ्या २ महिन्यात युरियाच्या किंमतीत दुपट्टीने वाढ झाली आहे. भारत जगातील सर्वात मोठा युरियाचा खरेदीदार देश आहे. २०२५ साली भारताची एकूण आयात गरजेच्या १ कोटी टन राहण्याचा अंदाज होता. त्यामुळे २५ लाख टन खरेदी भारताच्या गरजेच्या सुमारे एक चतुर्थांश भाग पूर्ण होईल. रिपोर्टनुसार, या निविदेअंतर्गत एकूण ५६ लाख टन युरिया पुरवण्याचे प्रस्ताव आले परंतु बहुतेक बोली प्रति टन सुमारे १,००० डॉलर किंवा त्याहून अधिक होत्या. केवळ काही मोजक्या पुरवठादारांनी ९३५ डॉलर ही सर्वात कमी किंमत देऊ केली आणि त्यानंतर उर्वरित पुरवठादारही त्याच किमतीत पुरवठा करण्यास सहमत झाले. यामुळे भारताला इतक्या मोठ्या प्रमाणात खरेदी करणे शक्य झाले. दरम्यान, भारताच्या या मोठ्या खरेदीचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम होईल. पुरवठादारांनी आधीच इतकी मोठी खेप भारताला देण्याचं आश्वासन दिले आहे. ज्यामुळे दुसऱ्या देशांना युरियाची कमतरता भासू शकते. त्यातून किंमती आणखी वाढू शकतात. या खरेदीचा थेट परिणाम भारत सरकारवरही होऊ शकतो. कारण सरकार शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते पुरवते आणि त्यासाठी कंपन्यांना सब्सिडी देते. त्यामुळे जेव्हा आयात महाग होईल तेव्हा अनुदानाचा भारही वाढेल. वास्तविक भारतीय बनावटीच्यावस्तूला तोड नाही. भारतीय शेंणखत कितीपट लाभदायक आहे. रासायनिक खताचा वापराचा परिणाम भोगत आहोत, ज्या प्रांतात अधिक उत्पादनासाठी रायायनिक खताचा वापर होता त्या राज्यातील जनता दुर्धर रोगग्रस्त आहेत हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. गोधनाचे महत्त्व अधिक आहे हे जाणून घेतले पाहिजे. गायतर दुध देते, त्यापासून दुध, दही, ताक व तुप होतेच, ती भाकड झाली तर तीचे गोमुत्र व शेंण कितीतरी उपयुक्त आहे हे लक्षात घेतले पाहिजे. एक लक्षात घ्या पुर्वीची मंडळी सुखी-समाधानी होती का आजची! केवळ विचार केला पाहिजे. पुर्वी काहीच सवलत नव्हती, एसटीला अर्धे तिकीट, मोफत धान्य, तहसीलकडून विविध योजना श्रावण, विधवा, वृद्ध, अपंग अशा कितीतरी योजना नव्हत्या मात्र त्याकाळी सुख व समाधान होते हे लक्षात घेतले पाहिजे. आता अनेक योजना आहेत. पीकाचे उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या रासायनिक खते आहेत, शेतीसाठी लागणारी औषधे आहेत तरी सुख, समाधान व शांती मिळत नाही हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. जीवनात रायायनिक बाबाचा जेवढा अधिक वापर करणार तेवढ्या प्रमाणात संकटे निर्माण होणार आहेत. ईस्त्राईल-इराणच्या युद्धामुळे खताचे मोठे संकट निर्माण झाले आहे. केवळ खताचे संकट नाही तर अनेक संकटाचा मुकाबला भारतीयांना करावा लागणार आहे. इंधनाचे मोठे संकट आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावामुळे मोठे संकट उभा आहे. वास्तवक होर्मुझचा भाग एक भारतीय उद्योगपती ईराणच्या मदतीने खरेदी करणारा होता अशी माहिती उघड झाली आहे. भारत स्वार्थी नेत्यांनी कमजोर केला आहे. पहिल्यांदा ज्यांच्या हातात भारताची सुत्री गेली ती योग्य व्यक्तीच्याह हाती न गेल्याने सर्वकाही भारताला कमजोर बनविले आहे. त्यामुळे पुन्हा सुवर्णयुग व गौरवशाली बनायाचे झाले तर पुर्वी सारखे नियोजन करावे लागेल. जुन्या व नव्यासंस्कृतीचे मिलन घडवुन ती स्विकारावी लागेल मात्र प्राचिन संस्कृती पुन्हा स्विकारावी लागेल तरच सुख, समाधान व जीवनात आनंद नांदेल.

# प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांना गुरु गौरव पुरस्कार प्रदान

## शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानाचा गौरव




**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शिक्षण, सामाजिक, शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांना ''गुरु गौरव'' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर १९ एप्रिल २०२६ रोजी स्वामी विवेकानंद विद्यालय सभागृहात हा दिमाखदार सोहळा पार पडला.

डॉ. सुनीता सांगोले या गेल्या २१ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. भाषाविज्ञान, भाषा उपयोजन आणि मराठी साहित्य हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय असून, त्यांनी आतापर्यंत ०५ ग्रंथांचे लेखन आणि ०६ ग्रंथांचे संपादन केले आहे. त्यांच्या भाषा व भाषा व्यवहार, मराठी साहित्य व स्त्रीविषयीची उत्तम संशोधक, व्याख्याता म्हणून त्यांनी सामाज तथा साहित्य वर्तुळात आपली ओळख निर्माण केली आहे. याशिवाय, ३ ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ०५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली असून, आजवर ४२ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. डॉ. सांगोले यांच्या कार्याची दखल केवळ राज्यातच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली आहे. त्यांनी रिद्धपूर (अमरावती) येथील मराठी भाषा विद्यापीठात प्रथम अधिष्ठाता म्हणून आणि व्यवस्थापन मंडळ सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. उस्मानिया (हैदराबाद), अलिगढ मुस्लिम विद्यापीठ (उत्तर प्रदेश) आणि विदर्भ संशोधन मंडळ (नागपूर) अशी विद्यापीठे व महाविद्यालये येथे साधन व्यक्ती म्हणून व्याख्याने दिली आहेत.

त्यांनी केवळ अध्यापनच नव्हे, तर प्रशासकीय क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. धारवाड विद्यापीठ आणि गुलबर्गा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे मराठी अभ्यास मंडळाच्या सदस्य आणि संशोधन समितीच्या समन्वयक म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

डॉ. सुनीता सांगोले यांचे कर्तृत्व गौरवास्पद आहेच, हा पुरस्कार त्यांच्या योगदानाची घेतलेली योग्य जाण होय. अशा शब्दांत दयानंद शिक्षण संस्था परिवार, प्राध्यापक, साहित्यिक आणि विद्यार्थी, स्नेही तसेच मित्र परिवाराने त्यांचे अभिनंदन केले. या गौरवाबद्दल बोलताना डॉ. सांगोले यांनी सर्वांचे ऋण व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रातील या गौरवशाली कामगिरीबद्दल लातूरच्या शैक्षणिक वर्तुळातून डॉ. सुनीता सांगोले यांचे विशेष कौतुक होत आहे.

# विश्वेश्वरय्या इंजिनीअरिंग महाविद्यालयाचे यश



**औसा/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इंन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व्दारा घेण्यात आलेल्या हिवाळी परिक्षा २०२५ बि. टेक. प्रथम वर्षाचा निकाल नुकताच जाहिर झाला असुन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संस्थेच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये महाविद्यालयातुन कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनीअरिंग (आर्टिफिशीयल इंटेलिजन्स अॅण्ड डाटा सायन्स) विभागातुन श्रावणी मुंजाळ ८.६१ गुणांकनाने प्रथम, स्नेहल बारबोले ८.०४ गुणांकनाने व्दितीय तर मधुरा नागराळे ७.८९ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे. तर सिव्हील इंजिनीअरिंग शाखेतुन सुदर्शन पारवे ८.४१ गुणांकनाने प्रथम, ऋतुजा पवार ७.७२ तर माहेश्वरी कांबळे ७.५९ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातून रक्षा माने ८.४१ सि.जी.पी.ए. गुणांकनाने प्रथम, सुमती मिरगळे ७.७६ गुणांकनाने व्दितीय तर नंदिनी माळी ७.७२ सि.जी.पी.ए. गुणांकनाने तृतीय आली आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे शैक्षणिक वातावरण कारणीभूत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. महाविद्यालयात नियमित शैक्षणिक उपक्रम, अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग, प्रात्यक्षिकांवर भर आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. चंद्रशेखर चरकपल्ले, प्रा. राहुल पिंड, प्रा. उदय खामकर उपस्थित होते. तसेच प्रा. अश्विनी धाराशिवे, प्रा. श्रध्दा बिडवे प्रा. शिवदर्शन हेंगणे, प्रा. प्रसाद चंदनशिवे, प्रा. सादिया कुरेशी सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त युवकांनी सकारात्मक संकल्प करावा : डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी




**अहमदपूर/प्रतिनिधी :** जयंती पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने या महामानवांच्या विचाराचा जागर घालून युवा शक्तीला आणखीन जागृत करावे तसेच जयंती हे प्रबोधनाचे माध्यम व्हावे यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे अवाहन युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

मौजे शिंदगी खु.येथे भार-तरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून दलित पँथर चे नेते संजयभाऊ कांबळे, सरपंच श्रीहरी सोडगीर, कचरे मामा, माजी सरपंच माधवराव देवकते, उपसरपंच संभाजी केवले, मौला शेख, बालाजी देवकते, विनोद कोळेकर, रमेश देवकते, उस्मान शेख, मूर्तूजा शेख, ईश्वर देवकते यांची उपस्थिती होती.

सूरूवातीला डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते पंचशिल ध्वजा-चे ध्वजारोहण करण्यात आले.तसेच सामूहिक त्रीशरण पंचशिल घेण्यात आले. पूढे बोलताना डॉ.सूर्यवंशी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे विविध पैलू समाजापुढे येणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब हे केवळ घटनेचे शिल्पकार नव्हते, तर ते शिक्षण-तज्ज्ञ, आमदार, खासदार, विरोधी पक्षनेते, अर्थतज्ज्ञ,मानववंशशास्त्रज्ञ, पत्रकार, संपादक, लेखक, विचारवंत,प्रभावी वक्ते, प्राध्यापक आणि वकील, धम्मप्रवर्तक अशा अनेक भूमिका त्यांनी आपल्या आयुष्यात यशस्वीपणे पार पाडल्या. प्रत्येक भूमिकेतून त्यांनी समाजातील दीन, दलित, शोषित आणि वंचित घटकांचा आवाज बुलंद केला आणि खऱ्या अर्थाने ''मूकनायक'' बनले. जयंतीनिमित्त युवकांनी काहीतरी सकारात्मक आणि नवीन संकल्प करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. आजच्या समाजात युवकांमध्ये वाढत चाललेले व्यसनाधीनतेचे प्रमाण चिंताजनक असून, यावर कठोर पाऊले उचलण्याची गरज आहे. ''आजच्या या पवित्र दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्मरून, आपल्या जीवनातील कोणतेही व्यसन या क्षणापासून सोडण्याची शपथ आपण घेत-ली, तरच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होईल,'' असे भावनिक आवाहन त्यांनी केले.''व्यसनाधीन समाज कधीही प्रगती करू शकत नाही. त्यामुळे युवकांनी स्वतःला सशक्त, जागरूक आणि जबाबदार नागरिक म्हणून घडवणे हीच बाबासाहेबांना खरी अभिवादन ठरेल,'' असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, युवक, महिला आणि आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रदिप जाभाडे,उपाध्यक्ष रामदास जाभाडे,सचिव सुमेध कचरे, संघटक प्रवीण जाभाडे, कोषाध्यक्ष-कुलिंद वाघमारे आदींनी पुढाकार घेतला.

# नारी शक्ती वंदन अभियान : सर्वसमावेशक स्त्री सक्षमीकरणासाठी शासनाचा व्यापक उपक्रम



भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा मूलभूत अधिकार प्रदान केला असला तरी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये महिलांना अद्याप विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर महिलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात अधिक सक्षमपणे सहभागी करून घेण्यासाठी शासनाने ''नारी शक्ती वंदन अभियान'' हा महत्त्वपूर्ण व सर्वसमावेशक उपक्रम हाती घेतला आहे.

**१. अभियानाची पार्श्वभूमी :**

देशातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक वर्षांपासून विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार महिलांच्या गरजा व अपेक्षा अधिक व्यापक झाल्या आहेत. या गरजांचा विचार करून महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी एकात्मिक दृष्टीकोनातून नारी शक्ती वंदन अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**२. अभियानाची दृष्टी व ध्येय :**

या अभियानाची दृष्टी ''सशक्त महिला सक्षम राष्ट्र'' अशी असून महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर व निर्णयक्षम बनविणे हे त्याचे मुख्य ध्येय आहे.

यासाठी खालील बाबींवर विशेष भर देण्यात येतो
महिलांना समान संधी व अधिकार प्रदान करणे
सामाजिक न्याय व सुरक्षिततेची हमी देणे
आर्थिक स्वातंत्र्य व उद्योजकतेला प्रोत्साहन देणे
शिक्षण व कौशल्य विकासाद्वारे प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे

**३. अभियानाचे प्रमुख उद्दिष्टे :**

* महिलांविषयी असलेली सामाजिक विषमता दूर करणे
* महिलांच्या हक्कांविषयी जनजागृती वाढविणे
* महिलांच्या आरोग्य, शिक्षण व पोषण स्थितीत सुधारणा करणे
* महिला स्वयंसहाय्यता गटांना बळकटी देणे
* महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे
* डिजिटल साक्षरता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे

**४. अभियानाचे प्रमुख घटक :**

**(अ) शैक्षणिक सक्षमीकरण :**

महिलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे, शाळा सोडलेल्या मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.

**(आ) आर्थिक सक्षमीकरण :**

महिलांना स्वयंरोजगार, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये संधी उपलब्ध करून देणे. स्वयं-सहाय्यता गट यांच्या माध्यमातून बचत व गुंतवणूक संस्कृती विकसित करणे.

**(इ) आरोग्य व पोषण :**

गर्भवती व स्तनदा महिलांसाठी विशेष आरोग्य सेवा, पोषण आहार योजना तसेच नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे.

**(ई) सुरक्षा व कायदेशीर संरक्षण :**

महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी, हेल्पलाईन सेवा, तसेच पोलिस व न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता वाढविणे.

**(उ) सामाजिक सक्षमीकरण :**

लिंगभेद, बालविवाह, हुंडा प्रथा यांसारख्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध जनजागृती करून महिलांना समान सन्मान मिळवून देणे.

**(ऊ) राजकीय सक्षमीकरण :**

स्थानिक स्वराज्य संस्था व इतर प्रशासकीय स्तरांवर महिलांचा सहभाग वाढविणे व नेतृत्वगुण विकसित करणे.

**५. अंमलबजावणी यंत्रणा :**

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधला जातो. ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत विविध समित्या स्थापन करून कार्यक्रमांची अंमलबजावणी व देखरेख केली जाते.

**६. जनजागृती व सहभाग :**

अभियानाच्या यशस्वीतेसाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी विविध माध्यमांद्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात येतात. शाळा, महाविद्यालये, ग्रामसभा, महिला बचत गट यांच्यामार्फत महिलांना त्यांच्या हक्कांविषयी माहिती दिली जाते.

**७. अपेक्षित परिणाम :**

* महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा
* महिला साक्षरतेत वाढ
* रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये वाढ
* महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये घट
* निर्णय प्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग

**८. निष्कर्ष :**

नारी शक्ती वंदन अभियान हे महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व दूरगामी परिणाम करणारे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांना केवळ सन्मान मिळणार नाही तर त्यांना स्वतःच्या क्षमतांचा विकास करून समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्याची संधी मिळेल.



महिलांचे सक्षमीकरण हेच राष्ट्राच्या शाश्वत विकासाचे मूळ आहे, ही जाणीव ठेवून प्रत्येक घटकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.

**-श्रीकांत चंद्रकांत देशमुख**
**जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली**

# रोज खाल मूठभर भिजवलेले बदाम तर राहाल फिट आणि फाईन



सुक्या मेव्यांबद्दल जेव्हा बोलले जाते तेव्हा बदामाला(रश्रोपवी) सर्वाधिक पसंती मिळते. नट्समध्ये बदामला सर्वाधिक हेल्दी म्हटले जाते. खासकरून बदाम जर रात्रभर भिजत ठेवून सकाळी खाल्लयास त्याचे आरोग्यस अधिक फायदे होतात.पोषकतत्वांनी भरपूर असलेल्या बदामाचे सेवन दररोज केल्यास केवळ हृदयच नव्हे तर मेंदूचे आरोग्यही सुधारते. जाणून घेऊया भिजवलेल्या बदामाचे फायदे-

बदामामध्ये हाय सॅच्युरेटेड फॅट्स भरपूर असतात याच कारणामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवत हृदयाचे आरोग्य चांगले राखते. बदामामध्ये मोठ्या प्रमाणात प्रोटीन आणि कॅल्शियसोबतच फायबर आणि मॅग्नेशियम असते. याशिवाय बदामामध्ये व्हिटामिन ई, ओमेगा ३ फॅटी ॲसिड, व्हिटामिन बी, नियासिन, रायबोफ्लेविन इत्यादी घटक आढळतात.जर बदाम रात्रभर भिजवून सकाळी सोलून खाल्लयास याचे पोषणतत्व दुपटीने वाढते. यामुळे आरोग्यास डबल फायदे मिळतात.भिजवलेले बदाम हृदय निरोगी राखण्याचे काम करतात. यामुळे मेंदूची कार्यक्षमता वाढते तसेच भिजवलेले बदाम चांगले पचतात. यामुळे पोट साफ होते आणि मेटाबॉलिज्म बूस्ट होण्यास मदत मिळते. याच्या सेवनाने पोटाच्या समस्या जसे गॅस, अपचन, ब्लोटिंगच्या समस्या तसेच पोटदुखीपासून सुटका मिळते.

# त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक-परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखामध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.



# रात्री उशिरा जेवण करणे शरिराला अति धोकादायक



मुंबई: आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीत रात्री उशिरापर्यंत जागणे आणि उशिरा जेवणे ही सामान्य गोष्ट झाली आहे. मात्र तुम्हाला ही सवय अनेक आजारांची शिकार बनवू शकते. रात्री उशिरा जेवणाची सवय तुम्हाला अनेक आजार देऊ शकते. आज आम्ही तुम्हाला याबद्दल सांगणार आहोत.

लठ्ठपणा-रात्रीच्या वेळेस आपले शरीर कमी कार्यरत असते. यावेळेस जेवलेले जेवण फार हळूहळू पचते. यामुळे कॅलरीज अधिक जमा होऊ लागतात. रात्री उशिरा जेवण केल्याने शरीरात फॅटचा स्तर वाढू शकतो यामुळे वजन वाढले आणि लठ्ठपणाचा धोका वाढतो.

टाईप २ डायबिटीज- शरीरासाठी रात्रीची वेळ आरामाची असते. यावेळेस शरीराची चयापचय क्रिया धीमी होते. रात्री उशिरा जेवण केल्याने इन्सुलिनचे स्त्राव व्यवस्थित होते नाही आणि यामुळे ब्लड शुगर लेव्हल असंतुलित होते.

हृदयरोग-रात्री उशिरा जेवण केल्याने शरीरात चरबीचा स्तर वाढतो. यामुळे हृदयरोगाचा धोका वाढतो. यावेळेस जेवण पचण्याची क्षमता कमी होते. यामुळे चरबी वाढते.

ॲसिडिटी आणि जळजळ

रात्री उशिरा जेवल्याने पोटात ॲसिडचा स्तर वाढतो. यामुळे ॲसिडिटी आणि छातीत जळजळ होऊ शकते.

# मतदानाचा हक्क अधांतरी

सर्वोच्च न्यायालयाने वारंवार सूचना देऊनही पश्चिम बंगालमध्ये लवादांचे काम का सुरू झाले नाही? 'लॉजिकल डिस्क्रिपन्सी' हा नवाच मुद्दा निवडणूक आयोगाने का उपस्थित केला? यांची उत्तरे कोण देणार? पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुकीत पहिल्या टप्प्यासाठी आज मतदान होत आहे. या टप्प्यातील प्रचार मंगळवारी संपला, तरी मतदार यादी सुधारणेच्या तीव्र मोहिमेत वगळलेल्या नावांबद्दल अजूनही संभ्रम कायम आहे. या मतदारांच्या अपिलाच्या सुनावणीसाठी निवडणूक आयोगाने १९ लवाद नेमले आहेत. पहिल्या टप्प्यातील प्रचार संपला तरी हजारो नागरिकांना आपले नाव मतदार यादीत आहे की नाही हे समजले नव्हते. 'पुरवणी यादीत तपशील आहेत', 'समन्स येईपर्यंत थांबा' अशी सरकारी छापाची उत्तरे त्यांना ऐकावी लागली. पडताळणी नंतर ज्यांच्या नावांचा निर्णय होणे अपेक्षित आहे, असे २७ लाख १० हजार मतदार आहेत. पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी पुरवणी यादी मंगळवारीच प्रसिद्ध होणे अपेक्षित होते. दुसर्या टप्प्याचे मतदान २९ रोजी आहे, त्याची पुरवणी यादी दि.२७ रोजी प्रसिद्ध होणार का? या बद्दल कोणी काही सांगू शकत नाही. २७ लाखांपेक्षा जास्त ही वगळलेल्या मतदारांची संख्या खूप मोठी आहे. त्यांना खरेच मतदान करता येणार नाही का? की 'ऐनवेळी' त्यापैकी काही जणांना हक्क बजावता येईल? हे गूढ निवडणूक आयोगाने निर्माण केले आहे. राज्यात सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसने मतदार याद्यांची 'सुधारणा' हा प्रचाराचा मुख्य मुद्दा बनवला त्यात नवल नाही. तामिळनाडूतही चुरस अपेक्षित

पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगाल मधील १५२ मतदार संघात मतदान होणार आहे. त्यापैकी उत्तर बंगालमध्ये जास्त आहेत. दक्षिणेतीलही बरेच मतदार संघ आहेत. नंदिग्राम हा एक महत्त्वाचा मतदारसंघ आहे. येथील आंदोलनामुळे ममता बॅनर्जी यांना २००७ मध्ये सत्ता मिळाली होती. गेल्या निवडणुकीत त्यांचे माजी सहकारी सुवेंदु अधिकारी यांच्याकडून ममता यांचा पराभव झाला होता. आता अधिकारी यांच्या विरोधात त्यांचे माजी सहकारी पवित्र कार यांना तृणमूलने उमेदवारी दिली आहे. भाजपने यंदा बंगाल जिंकण्याचा चंग बांधला असला तरी त्यांची वाट सोपी नाही. महिला आरक्षण विधेयकास तृणमूलने विरोध केल्याबद्दल भाजप त्यांना महिला विरोधी ठरवत आहे. पण सर्वांत जास्त महिला खासदार याच पक्षाच्या आहेत. 'लक्ष्मिर भांडार' या योजनेमुळे लाखो महिला तृणमूलशी जोडल्या गेल्या आहेत. ममता यांच्या कारभाराविषयी रोष फारसा दिसत नाही. मतदारांची नावे वगळणे हे भाजपचे कारस्थान आहे असा ममता यांचा आरोप आहे. त्याला मतदार कसा प्रतिसाद देतात ते पाहायचे.

तामिळनाडूतही द्रमुकच्या सरकारच्या विरोधात मोठा असंतोष दिसत नाही. महिला आरक्षण विधेयकाला मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनीही तीव्र विरोध केला होता. मतदारसंघांच्या फेररचनेमुळे दक्षिणी राज्यांवर अन्याय होईल हे त्यांचे ठाम म्हणणे आहे. तामिळनाडूतील सर्व २३४ जागांसाठी आजच एका टप्प्यात मतदान होत आहे. द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या आघाड्यांत मुख्य लढत होत असली तरी अभिनेता विजय याचा पक्ष कोणास फटका देणार ही दोन्ही आघाड्यांसाठी थोडी काळजीची बाब आहे. विजय राजकारणात नवे असले तरी त्यांचा युवा वर्गात मोठा प्रभाव आहे. द्रमुक हा आपला राजकीय शत्रू आहे तर भाजप हा वैचारिक शत्रू आहे असे त्यांनी प्रचाराच्या समारोपाच्या सभेत जाहीर केले. प्रसिद्ध अभिनेता कमल हासन यांच्या पक्षाने द्रमुकला पाठिंबा दिला आहे. त्यांनी प्रचारातही भाग घेतला होता. काँग्रेस हा द्रमुकच्या आघाडीतील प्रमुख पक्ष असला तरी राहुल गांधी आणि स्टॅलिन यांनी एकत्र प्रचार का केला नाही हा प्रश्न येथे चर्चेत आहे. भाजपने येथेही बराच जोर लावला आहे. त्या पक्षाच्या मदतीने अण्णा द्रमुक परत सत्तेत येणार का? हा कळीचा मुद्दा बनला आहे. आसाम, केरळ व पुदुचेरीत या वेळी विक्रमी मतदान झाले. तसेच बंगालच्या पहिल्या टप्प्यात व तामिळनाडूत होणार का? या विषयी उत्सुकता आहे. तसे झाले तर वाढीव मते कोणाच्या पारड्यात जाणार? हा पुढचा प्रश्न सर्वांचीच चिंता वाढवेल. पश्चिम बंगालमध्ये वगळलेल्या लाखो मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येतो की नाही हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे.



## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

हळदीचे दूध-कोरड्या खोकल्यापासून पूर्णपणे बरं होण्यासाठी हळदीचे दूध अत्यंत प्रभावी असते. रात्री झोपण्याच्या आधी ते घ्यावे.



कोमट पाणी-पिण्याच्या सवयीमुळे शरीरातील चयापचय दर वाढतो, त्यापेक्षा कोमटपाणी कोरडा खोकला दूर करण्यास प्रभावी आहे. दिवसांतून ३ वेळा कोमट पाणी प्यायल्याने खोकल्यावर त्वरित आराम मिळू शकतो.

वाफ घेणे-वाफ घेतल्याने आपणास द्रुत आणि प्रभावी परिणाम मिळतात. गरम पाण्याची वाफ घेणे हा एक सोपा आणि घरघुती उपाय आहे. आपण कधीही ते करू शकता. घश्यात होणारी खवं-खवं आणि थंडपणावर त्वरीत आराम होतो.

## २ Joke विनोद





चल माझा टॉप काढ...

एका मुलीने आपल्या बॉयफ्रेंडला सरळ आपल्या खोलीत नेले.

मुलगी - चल माझा टॉप काढ...

थांबलास का...स्कर्टपण काढ.... आणि यापुढे माझे कपडे घालण्याचा प्रयत्न करू नको...

## ३ Message संदेश



Tamanna ly k ulfat ki
Mery aangan me wo aaya
phr me ne 1 rupy ka sikka
diya
Or
Laat maar k bhagaya

## ४ Thought सुविचार




एखाद्या सच्च्या वैज्ञानिकाला जर त्याच्या विज्ञानाविषयी एखादा अत्यंत गहन प्रश्न विचारला तर तो वैज्ञानिक नि:शब्द होईल, आणि एखाद्या सच्च्या धार्मिक मनुष्याला जर त्याच्या धर्माविषयी एखादा अत्यंत साधा प्रश्न विचारला तर तो धार्मिक मनुष्य कृद्ध होईल.- **केदार जोशी**

**संस्कृत सुभाषित**

**मद्यपस्य कुतः सत्यं, दया मांसाशिनः कुतः।**
**कामिनश्च कुतो विद्या, निर्धनस्य कुतः सुखम् ।।**

अर्थ : दारूच्या आधीन झालेल्या माणसाला सत्य ठाऊक नसते, मांसाहाराची आवड असणाऱ्याला दया नसते, स्त्रीविषयी आत्यंतिक कामवासना असणाऱ्याला विद्या कुठून मिळणार आणि दरिद्री माणसाला सुख कसे मिळणार? पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. दृष्टी
३. तात्काळ उत्तर देणारा
८. टाळ्यांचा आवाज
११. भ्रमर, भुंगा
१२. नेत्रकटाक्ष
१३. दशानन
१४. नातेवाईक
१५. पार्थिव
१७. झुणक्याबरोबरची रोटी
१८. बळेच काढलेला मुहूर्त
१९. जाडसर पीठ
२१. विनाश करणारी
२२. नम्र, वाकलेला
२४. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
२६. पाच दिवसाचा क्रिकेट सामना
३०. फळातील द्रव
३२. आप्त नसलेला
३३. खोटेपणा
३४. सम्राट
३५. खूप, पुष्कळ
३७. वर्षभर
३९. लाकूड कापण्याचे हत्यार
४१. रत्नमाला, रत्नांची माळ
४३. कापूस
४६. उभाच्या उभा!
४७. उत्कृष्ट बल्लवाचार्य म्हणून प्रसिद्ध असलेला दमयंतीचा पती
५०. अयोध्येचा राजा
५२. उत्तराधिकारी
५४. चंद्र
५५. थंडगार
५७. मातीचा सूक्ष्म कण
५८. कोळिष्टकावरील धागे
६०. श्वासरोग
६१. चणचण, दुर्भिक्ष्य
६२. परमेश्वर
६३. चट्टामट्टा
६५. फूल
६७. पवित्र
६९. सर्वत्र सांगत सुटणे
७१. निपचित
७३. फोडातील द्रव
७४. बलुतोदारी व्यवस्थेतील गावप्रमुख
७६. जन्म
७७. खोल खाई
७८. दरोडा
७९. बाळाच्या हातातील मणिबंध

## उभे शब्द

१. देवीचा उत्सव
२. श्रीविष्णूचे एक नाव
३. उगीच
४. अटीची भाषा
५. लोकसंख्येची मोजणी
६. क्रिकेटमधील अवांतर धाव (इंग्रजी)
७. पुंगी
८. नारायण राणे यांचे गाव
९. कंबरेवर
१०. हजरा किलो
१६. पाठविलेला
१७. लुच्ची
१८. राघोबांचे नारायणरावांशी नाते
२०. वेडावाकडा
२१अ. थंडीची लाट
२३. मऊ
२५. शिकार
२७. सर्प
२८. एक सुगंधी वनस्पती
२९. कुरापत
३१. मदतनीस
३३. आघात
३६. बाण
३६अ. मुस्लीम
३८. लोणच्यातील रस
४०. समशेर
४२. अधाशी, लालची
४४. हातातून निसटणारे खनिज
४५. सर्वांना सारखे
४६. नावाडी
४८. तर्क
४९. मनीची इच्छा
५१. संगोपन, लाडकोड पुरवणे
५२अ. ऊभदार पांघरुण
५३. गोंधळ
५६. पोळी भाजण्याचे साधन
५९. माजलेला, गर्वीष्ठ
६०. धमकावणी
६१अ. संधी, मोका
६४. रांग
६६. हृदय
६८. रोख
६९. पांढुरका रंग
७०. हिंदीत शपथ
७२. तऱ्हा, प्रकार
७४. फलक
७५. नेम, उद्दिष्ट

## आडवे उत्तर

१.नजर ३.हजरजबाबी ८.कडकडाट ११.मधुकर १२.नयनबाण १३.रावण १४.नातलग १५.कलेवर १७.भाकर १८.काढीव १९.रवा २१.विनाशिका २२.लीन २४.नासा २६.कसोटी सामना ३०.रस ३२.परका ३३.लबाडी ३४.महाराज ३५.अतिशय ३७.बारमाह ३९.करवत ४१.रत्नहार ४३.कपास ४६.खडा ४७.नल ५०.राम ५२.वारसदार ५४.रजनीश ५५.शीतल ५७.रज ५८.जळमट ६०.दमा ६१.वानवा ६२.ईश ६३.फस्त ६५.सुमन ६७.पावन ६९.कळवाकळवी ७१.गपगार ७३.लस ७४.पाटील ७६.जनन ७७.दरी ७८.डाका ७९.मनगटी

## उभे उत्तर

१.नवरात्र २.रमण ३.हकनाक ४.जरतर ५.जनगणना ६.बाय ७.बीन ८.कणकवली ९.कडेवर १०.टन १६.रवाना १७.भामटी १८.काका २०.वाकडा २१अ.शीतलहर २३.नरम २५.सावज २७.साप २८.मरवा २९.खोडी ३१.सहायक ३३.प्रहार ३६.शर ३६अ.यवन ३८.खार ४०.तलवार ४२.हावरट ४४.पारा ४५.समसमान ४६.खलाशी ४८.अंदाज ४९.मनीषा ५१.लालनपालन ५२अ.रजई ५३.रळफळ ५६.तवा ५९.मस्तवाल ६०.दमदाटी ६१अ.वाव ६४.ओळ ६६.काळीज ६८.नगद ६९.करडा ७०.कसम ७२.परी ७४.पाटी ७५.लक्ष्य



# क्रीडा विश्व

# वानखेडेवर 'चेन्नई'चा ऐतिहासिक विजय; फिरकीच्या जाळ्यात अडकले मुंबईकर!

नवी मुंबई: आयपीएल २०२६ च्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सवर एकतर्फी विजय मिळवला. संजू सॅमसनच्या नाबाद १०१ धावांच्या शतकी खेळीनंतर फिरकीपटूंच्या अचूक माऱ्यामुळे मुंबईचा पराभव झाला. रोहित शर्मा आणि एमएस धोनी या सामन्यात दुखापतीमुळे खेळले नाहीत.
चींलरळ खपवळरपी ीी उहशपपरळ डीीशि घळपसी:
चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सला वानखेडे स्टेडियमवर पराभूत केलं आहे. मुंबई इंडियन्सचा गड समजला जाणाऱ्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सला पराभूत करणं मुळीच सोपं नव्हतं. पण याच मैदानावर आता मुंबईला एका पाठोपाठ एक पराभवाचा सामना करावा लागत आहे. चेन्नईविरुद्ध वानखेडे स्टेडियमवर खेळताना मुंबईचा रेकॉर्ड दमदार होता. पण या सामन्यात मुंबईला एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला आहे. संजू सॅमसनच्या १०१ धावांच्या खेळीच्या बळावर चेन्नईने २०७ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा बचाव

## या सामन्यातील ५ महत्वाचे मुद्दे

करताना नूर अहमद आणि अकिल हुसेन यांनी मुंबईच्या फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवलं. मुंबईला हा सामना १०३ धावांनी गमवावा लागला आहे.

रोहित - धोनी बाहेर

या सामन्यात एमएस धोनी आणि रोहित शर्मा खेळणार असल्याची चर्चा होती. या सामन्याआधी एमएस धोनी वानखेडे स्टेडियमवर सराव करताना दिसून आला होता. पण या सामन्यासाठी त्याला संघात स्थान देण्यात आलेलं नाही. तो अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. तर रोहित शर्मा देखील खेळणारा असल्याचं म्हटलं जात होतं. पण तो देखील पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे मुंबई इंडियन्सचा संघ रोहित शर्माशिवाय मैदानात उतरला.

या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून चेन्नईला प्रथम



फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईकडून संजू सॅमसनने नाबाद १०१ धावांची दमदार शतकी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १० चौकार आणि ६ षटकार खेचले. तर ऋतुराज गायकवाडने २२, सर्फराज खानने १४, शिवम दुबेने ५, डेवाल्ड ब्रेव्हिस २१, कार्तिक शर्माने १८, जेमी ओव्हरटनने १५ तर अकिल हुसेनने २ धावा केल्या. यासह चेन्नईने २० षटकांअखेर ६ गडी बाद २०७ धावा केल्या. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी २०८ धावांचा पाठलाग करायचा होता. त्यामुळे फलंदाजांकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण कुठलाच फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. क्विंटन डीकॉक अवघ्या ७ धावा करून माघारी परतला. तर दानिश मालेवार आणि नमन धीर हे दोघेही शून्यावर माघारी परतले. सूर्यकुमार यादवने ३६, तिलक वर्माने ३७, हार्दिक पांड्या १ धाव करून माघारी परतला. रुदरफोर्डकडून मोठया खेळीची अपेक्षा होती. पण तो पहिल्याच चेंडूवर शून्यावर माघारी परतला.

वानखेडेवर फिरकी गोलंदाजांचा बोलबाला

या सामन्यात धावांचा बचाव करताना चेन्नई सुपर किंग्ज संघातील फिरकी गोलंदाजांनी मोलाची भूमिका बजावली. नूर अहमद आणि अकिल हुसेन या फिरकी गोलंदाजांनी मिळून ८ षटकात अवघ्या ४४ धावा खर्च केल्या आणि ६ गडी बाद केले. अकिल हुसेनने ४ षटकात १ निर्धाव षटक टाकत १७ धावा खर्च केल्या आणि ४ गडी बाद केले. तर तर नूर अहमदने २४ धावा खर्च करून २ गडी बाद केले.

गुणतालिकेत चेन्नईची झेप

या विजयासह चेन्नई सुपर किंग्ज संघाने गुणतालिकेत मोठी झेप घेतली आहे. या सामन्याआधी चेन्नईचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी होता, तर चेन्नईचा संघ सातव्या स्थानी होता. आता चेन्नईचा संघ पाचव्या स्थानी पोहोचला आहे. तर मुंबईचा संघ आठव्या स्थानी पोहोचला आहे.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### क्रिकेट स्टेडियमच्या बांधकामाला सुरुवात

**लॉस एंजेलिस**–आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी क्रिकेट स्टेडियमच्या बांधकामाच्या सुरुवातीचे स्वागत केले असून, याला खेळासाठी एक ऐतिहासिक क्षण म्हटले आहे. कॅलिफोर्नियातील लॉस एंजेलिस काउंटीमधील पोमोना येथील फेअरप्लेक्स स्टेडियममध्ये भूमिपूजन सोहळा पार पडला. हे पाऊल १२८ वर्षांनंतर क्रिकेटच्या ऑलिम्पिकमधील पुनरागमनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.
आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, क्रिकेट आणि जगभरातील त्याच्या लाखो चाहत्यांसाठी हा एक अत्यंत रोमांचक क्षण आहे. ते पुढे म्हणाले की, क्रिकेट एक जागतिक खेळ म्हणून आपला दर्जा सातत्याने मजबूत करत आहे आणि ऑलिम्पिकचा भाग असणे ही अभिमानाची बाब आहे.
आयसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांनीही या उपक्रमाला मफ्ऐतिहासिकफ्फ म्हटले असून, येत्या काही वर्षांत अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले जातील, ज्यामुळे क्रिकेटचे ऑलिम्पिकमधील पुनरागमन आणखी विशेष होईल, असेही ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, ऑलिम्पिकमधील समावेशामुळे या खेळाला नवीन ओळख, अधिक पोहोच आणि जागतिक स्तरावर अधिक मजबूत पाठिंबा मिळेल.

### आयपीएलच्या मध्यातच इशान किशनला बाजूला करणार?

**मुंबई**–आयपीएल २०२६ मध्ये सनरायझर्स हैदराबाद उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. संघाने आपले शेवटचे तीन सामने जिंकले आहेत. असे असूनही, हंगामाच्या मध्यात इशान किशनकडून कर्णधारपद काढून घेतले जाऊ शकते. नियमित कर्णधार पॅट कमिन्स आता संघात सामील झाला आहे. हंगामाच्या सुरुवातीला कमिन्स उपस्थित नव्हता, त्यामुळे कर्णधारपदाची जबाबदारी इशान किशनवर होती.
हैदराबाद आता काय करणार?
मात्र, इशान किशनच्या कर्णधारपदाखाली हैदराबादसाठी हा हंगाम पुनरागमन आणि संतुलनाचा ठरला आहे. सुरुवातीच्या पराभवांनंतर, सुधारित गोलंदाजी आणि मैदानातील उत्तम समन्वयामुळे संघाने पुन्हा एकदा लय मिळवली आहे. कर्णधारासोबतचा किशनचा सहजपणा आणि खेळाडूंसोबतचा त्याचा सुधारलेला ताळमेळ हे या बदलामागील प्रमुख कारण आहे. आता कमिन्स दुखापतीतून परतण्यास तयार असल्याने, हैदराबादला आपल्या अनुभवी कर्णधाराकडे परत जायचे की संघाला पुन्हा मार्गावर आणणाऱ्या तरुण कर्णधारावर विश्वास कायम ठेवायचा, याचा निर्णय घ्यावा लागेल. हा निर्णय सोपा नाही आणि त्याचा उर्वरित हंगामावर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो.

### विश्वविक्रमाची बरोबरी करणारा खेळाडू कोण?


मुंबई–आयपीएल २०२६ चा दमदार सीजन सुरु असतानाच अजून एक सिरीज सुरु आहे. सध्या महिला संघाच्या स्पर्धा सुरु असून बुधवारी भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका या देशाच्या महिला संघात सामना खेळवला गेला. २२ एप्रिलच्या रात्री हा महिला संघांमधील टी–२० मालिकेचा तिसरा सामना खेळला गेला. जोहान्सबर्ग येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात एक खेळाडू खूप चमकली. जोहान्सबर्गमध्ये झालेल्या या लढतीत दक्षिण आफ्रिकेने एकतर्फी विजय मिळवला आणि या विजयाची मुख्य नायिका ठरली कर्णधार लॉरा वूल्वार्ड! वूल्वार्डने आपल्या टी–२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील तिसरे शतक झळकावून इतिहास रचला. तिने दक्षिण आफ्रिकेसाठी सर्वात जलद शतक झळकावले. या शतकासह, तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्मृती मंधाना आणि मेग लॅनिंग यांच्या नावावर असलेल्या विश्वविक्रमाची बरोबरी केली.लॉरा वूल्वार्डने या सामन्यात जबरदस्त फलंदाजी करत अवघ्या कमी चेंडूंमध्ये शतक झळकावले. १४ चौकार आणि ५ षटकारांसह त्यांनी २१६ पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने खेळ करत भारतीय गोलंदाजांची अक्षरश: धुलाई केली. त्यांच्या या खेळीमुळे त्यांनी टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतकांपैकी एक नोंदवले.



# मी हा विजय त्याला:, ऋतुराज गायकवाडने चेन्नईचा ऐतिहासिक


### विजय कोणाला समर्पित केला? वक्तव्याने जिंकली सर्वांची मनं

नवी मुंबई: ऋतुराज गायकवाडने चेन्नईच्या विजयानंतर बोलताना सर्वांची मनं जिंकली. त्याने मुंबई इंडियन्सवरील विजय पाहा कोणाला समर्पित केला आहे.
चेन्नई सुपर किंग्सने वानखेडेच्या मैदानावर मुंबई इंडियन्स संघावर ऐतिहासिक विजय मिळवला. मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु चेन्नईच्या स्फोटक फलंदाजीने आणि त्यानंतर संघाच्या उत्कृष्ट गोलंदाजीने मुंबई इंडियन्सला गुडघे टेकायला भाग पाडलं. चेन्नईने मुंबईवर तब्बल १०३ धावांनी दणदणीत विजय नोंदवला.
कर्णधार ऋतुराज गायकवाडने संघाचा हा ऐतिहासिक विजय एका खेळाडूला समर्पित केला. पाहूया नेमकं काय म्हणाला?
सीएसकेने २० षटकांत २०७ धावांचा भक्कम डोंगर उभारला आणि प्रत्युत्तरात मुंबईला १९ षटकांत केवळ १०४ धावांवर गुंडाळलं. यासह, चेन्नईने १०३ धावांनी विजय मिळवला.
या हंगामातील चेन्नई सुपर किंग्सचा हा तिसरा विजय आहे. मुंबईला सीएसकेविरूद्ध १०३ धावांनी पराभव पत्करावा लागला. आयपीएलच्या इतिहासातील मुंबईचा सर्वात मोठा आहे. संजू सॅमसन संघाच्या या ऐतिहासिक विजयाचा सामनावीर खेळाडू ठरला.
ऋतुराज गायकवाड चेन्नई सुपर किंग्सच्या विजयानंतर काय म्हणाला?
कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या सामन्यानंतर वक्तव्याने तर सर्वांची मनं जिंकली आहे. ऋतुराज गायकवाडला सामन्यानंतर मुकेश चौधरीबद्दल सुरूवातीला विचारण्यात आलं. तेव्हा ऋतुराज म्हणाला, त्याच्यासाठी ही स्थिती खूप कठीण होती. मी हा विजय त्याला (मुकेश चौधरी) समर्पित करतो. अशा वेळी मैदानात येणं मानसिकदृष्ट्या खूप आव्हानात्मक असतं. पण तो संघासाठी, फ्रँचायझीसाठी परत आला, कारण त्याला माहिती होतं की आम्हाला त्याची गरज आहे. त्याचं खूप कौतुक करायला हवं. आम्ही गोलंदाजीला उतरण्यापूर्वी देखील हेच बोललो की आजचा सामना आम्हाला मुकेशसाठी जिंकायचा आहे. आम्हा सगळ्यांना त्याच्यासाठी चांगलं खेळायचं होतं आणि प्रत्येकाने त्याला साथ दिली.
ऋतुराजने मुकेश चौधरीला विजय का समर्पित केला?
मुकेश चौधरीच्या आईचं अवघ्या काही दिवसांपूर्वी दीर्घ आजाराने निधन झालं होतं, आईच्या निधनानंतरही तो मुंबई इंडियन्सविरूद्ध सामन्यासाठी संघात दाखल झाला आणि प्लेईंग इलेव्हनमध्ये खेळताना दिसला. मुकेश चौधरीला सामन्यातील दुसरं षटक टाकण्याची संधी मिळाली. मुकेशने षटकाची कमाल सुरूवात करत सलग ४ डॉट बॉल टाकले आणि त्यानंतर पाचव्या चेंडूवर क्विंटनला क्लीन बोल्ड करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. यानंतर त्याने आभाळाकडे पाहत जणू आईला विकेट समर्पित करत श्रध्दांजली वाहिली.
विजयाबद्दल कसं वाटतंय बोलताना कर्णधार ऋतुराज म्हणाला, छान वाटतंय. टॉसच्या वेळी मी संभ्रमात होतो. दोन्हीच्या बाबतीत माझं मत ५०–५० होतं. मन सांगत होतं की आधी फलंदाजी करावी, कारण पिच थोडं हिरवं होतं पण थोडं कोरडंही होतं. सुरुवातीच्या काही षटकांत परिस्थिती समजून घ्यावी लागली. मी आणि संजूने ठरवलं की चेंडू व्यवस्थित येत नाहीये, त्यामुळे सुमारे २०० धावा चांगला स्कोअर ठरेल. त्यानंतर अकील आणि नूरने चांगली गोलंदाजी केली. प्रत्येकाने आपापली भूमिका चांगली निभावली. संजूनेही शानदार खेळी केली, तो उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि आमची गोलंदाजीही मागील सामन्यांपेक्षा सुधारताना दिसतेय. मला वाटतं आम्ही आता हळूहळू योग्य लयीत येत आहोत.



# सीएसके च्या खेळाडूवर कोसळला दु:खाचा डोंगर, मुंबईविरुद्धच्या मॅचआधी आईचं निधन

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये मुंबईविरुद्धच्या मॅचआधी सीएसकेच्या खेळाडूवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सीएसकेचा फास्ट बॉलर मुकेश चौधरी याच्या आईचे निधन झालं आहे. सीएसकेने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून मुकेश चौधरीच्या आईच्या निधनाची माहिती दिली. 'मुकेश चौधरीच्या आईचा मृत्यू झाला आहे, सीएसके कुटुंब मुकेश आणि त्याच्या कुटुंबाच्या दु:खात सहभागी आहे. या कठीण काळात आम्ही प्रार्थना करतो', असे सीएसके त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहे.
एका वर्षापासून आजारी
मुकेश चौधरीची आई प्रेम देवी मागच्या एका वर्षापासून गंभीर आजाराने ग्रासली होती. मुंबईच्या टाटा हॉस्पिटलमध्ये मुकेशच्या आईवर उपचार सुरू होते.



मंगळवारी मुकेशच्या आईचं निधन झालं. मुकेश सध्या सीएसकेच्या टीममध्ये नाहीये, त्यामुले तो गुरूवारी होणाऱ्या मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात खेळण्याची शक्यता कमी आहे. मुकेश चौधरी २०२२ पासून सीएसकेसोबत आहे. २०२२ मध्ये त्याने आयपीएल पदार्पण केलं होतं. त्या मोसमात १३ सामन्यांमध्ये मुकेशने १६ विकेट घेतल्या होत्या. पण या मोसमानंतर त्याला दुखापत आणि इतर खेळाडू उपलब्ध असल्यामुळे खेळण्याची फार संधी मिळाली नाही. २०२२ नंतर मुकेश फक्त ४ मॅच खेळला आहे. आयपीएल २०२६ मध्ये मुकेशला फक्त एकच मॅच खेळण्याची संधी मिळाली, ज्यात त्याने २ विकेट घेतल्या.
सीएसकेच्या बऱ्याच खेळाडूंना दुखापती झाल्या आहेत. फास्ट बॉलर खलील अहमद आधीच दुखापतीमुळे संपूर्ण मोसमातून बाहेर झाला आहे, तर मुकेश चौधरीही टीममध्ये नाही. टीमचा आक्रमक बॅटर आयुष म्हात्रेही हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे संपूर्ण सिझन खेळू शकणार नाही. आयपीएलच्या या मोसमात सीएसकेने ६ पैकी २ मॅच जिंकल्या असून ४ सामने गमवले आहेत. पॉईंट्स टेबलमध्ये सीएसके आठव्या क्रमांकावर आहे. मुंबईविरुद्धचा सामना जिंकून विजयाच्या मार्गावर परत यायचा सीएसकेचा प्रयत्न असेल.

# दिल्ली कॅपिटल्सची ताकद वाढणार; खतरनाक गोलंदाज लवकरच संघात सामील होणार

नवी दिल्ली–आयपीएल २०२६ मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघ संघर्ष करत आहे, पण आता त्यांच्यासाठी एक चांगली बातमी आहे. वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क लवकरच संघात सामील होईल, जरी त्याला खेळण्यासाठी थोडा वेळ लागेल. एकूणच, यामुळं संघाला काहीसा दिलासा मिळेल. स्टार्कची गणना जगातील सर्वात बलाढ्य वेगवान गोलंदाजांमध्ये केली जाते.
मिचेल स्टार्कला आयपीएलमध्ये खेळण्यासाठी हिरवा कंदील : ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कला आयपीएलमध्ये खेळण्याची परवानगी मिळाली आहे. त्याला अलीकडेच खांदा आणि कोपराचा त्रास झाला होता. तो आता ठीक असून लवकरच भारतात परत येऊन आपल्या संघात सामील होण्याची शक्यता आहे.
दरम्यान, ईएसपीएन क्रिकइन्फोच्या एका अहवालानुसार, मिचेल स्टार्क या वर्षीच्या आयपीएलमधील आपला पहिला सामना १ मे रोजी खेळू शकतो, जेव्हा दिल्ली कॅपिटल्सचा सामना राजस्थान रॉयल्सशी होईल.
बीबीएल दरम्यान स्टार्क जखमी : मिचेल स्टार्क जानेवारीपासून एकही सामना खेळलेला नाही. यापूर्वी तो इंग्लंडविरुद्धच्या ॲशेस मालिकेत खेळला होता, जिथे त्यानं उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्याने ३१ बळी घेतले, ज्यामुळे त्याला मालिकावीराचा सन्मान मिळाला. त्यानंतर तो काही बीबीएल सामन्यांमध्ये खेळला. याच काळात, झेल घेण्यासाठी झेप घेताना त्याच्या डाव्या खांद्याला आणि कोपराला दुखापत झाली. थोड्या विश्रांतीनंतर, जेव्हा तो परतला, तेव्हा वेदनांमुळे त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला. त्यामुळं, तो अद्याप आयपीएलमध्ये सहभागी होऊ शकलेला नाही.पॅट कमिन्सचंही पुनरागमन : दरम्यान, ऑस्ट्रेलियन पॅट कमिन्सही आपल्या संघात सामील झाल्याची बातमी समोर येत आहे. पॅट कमिन्स आता पूर्णपणे बरा झाला असून लवकरच तो सनरायझर्स हैदराबाद या आपल्या संघाकडून खेळताना दिसू शकतो, अस वृत्त आहे. त्याच्या अनुपस्थितीत, इशान किशन एसआरएच संघाचं कर्णधारपद भूषवत आहे.दिल्ली कॅपिटल्स सध्या गुणतालिकेत पाचव्या क्रमांकावर : दिल्ली कॅपिटल्सबद्दल बोलायचं झाल्यास, संघानं सहा सामने खेळले असून, त्यात तीन जिंकले आहेत आणि तीन गमावले आहेत. संघाकडे सहा गुण असून तो पाचव्या क्रमांकावर आहे. संघाला अव्वल चारमध्ये स्थान मिळवण्याचा दावेदार मानलं जात आहे,

# हार्दिकने मुंबईच्या पराभवाचं खापर कोणाच्या डोक्यावर फोडलं?

नवी मुंबई: आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३३ वा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. मुंबईला विजयासाठी २०८ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना क्विंटन डीकॉक पासून ते शेफरेन रुदरफोर्डपर्यंत सर्वच फलंदाज फ्लॉप ठरले. मुंबईला हा सामना १०३ धावांनी गमवावा लागला. स्पर्धेतील पाचवा सामना गमावल्यानंतर हार्दिक पंड्या काय म्हणाला? जाणून घ्या.
धावांचा पाठलाग करताना मुंबईला पावरप्लेमध्ये हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. याबाबत बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, मला वाटतं, पावरप्लेमध्ये विकेट गेल्यानंतर काम अवघड होतं. कारण त्यामुळे आम्ही सामन्यात मागे पडत गेलो आणि त्यानंतर सावरू शकलो नाही.
तसेच खेळपट्टीबाबत बोलताना तो म्हणाला की, मी खेळपट्टीबद्दल काही बोलणार नाही. मी असा





व्यक्ती नाही, जो पराभवाचं खापर खेळपट्टीवर फोडणार. त्यांनी खूप चांगली फलंदाजी केली. त्यांनी २०७ धावांचा डोंगर उभारला. तीच खेळपट्टी होती. आम्ही फक्त चांगली फलंदाजी करायला हवी होती. आमच्या फिरकी गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली. संजूने अप्रतिम फलंदाजी केली. त्यांच्या फलंदाजांनी सातत्याने धावा करत त्यांना एका मजबूत धावसंख्येपर्यंत पोहोचवलं. आव्हानाचा यशस्वी पाठलाग करण्यासाठी आम्हाला पावरप्लेमध्ये चांगल्या सुरुवातीची गरज होती. मोमेंटम आमच्या बाजूने असायला हवा होता, पण ते आम्हाला जमलं नाही.
पहिल्या डावात फलंदाजी करताना संजू सॅमसनने दमदार शतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्ज संघाने २०७ धावांचा डोंगर उभारला. मुंबईला हा सामना जिंकण्यासाठी २०८ धावा करायच्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना सलामीला आलेला क्विंटन डीकॉक शून्यावर माघारी परतला. तर दानिश मालेवार आणि नमन धीर हे दोघेही शून्यावर माघारी परतले. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने मिळून मुंबईचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तिलक वर्मा ३७ धावांवर बाद होताच मुंबईला लागोपाठ ३ मोठे धक्के बसले. सूर्यकुमार यादव ३७ धावा करून माघारी परतला. तर हार्दिक पंड्या १ आणि रूदरफोर्ड शून्यावर बाद झाला. मुंबईचा डाव


## तिलाटी ते अक्कलकोट रेल्वे मार्गिकेवर स्थित रेल्वे फाटक २६ एप्रिलपर्यंत बंद राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** तिलाटी ते अक्कलकोट रेल्वे मार्गिकेवर स्थित रेल्वे फाटक दिनांक २४ ते २६ एप्रिल पर्यंत बंद दुरूस्तीमुळे बंद राहणारआहे.

दुरुस्ती आणि डागडुजीच्या कामाकरिता रेल्वे फाटक क्र. ६१ जो कि रेल्वे की.मी. ४७७/२-३ तिलाटी ते अक्कलकोट रेल्वे मार्गिकेवर स्थित आहे. दिनांक २४.०४.२०२६ ते २६.०४.२०२६ दरम्यान तीन दिवस सकाळी ०९:०० ते रात्री ०७:०० वाजेपर्यंत बंद राहील.

तरी फाटकाच्या नजीक असणाऱ्या गावकर्यांनी आणि वाहतूकदारांनी याची नोंद घ्यावी.

## श्रावणी रत्न पुरस्काराने सोलापूर चे विजयकुमार पोतदार सन्मानीत



**सोलापूर/प्रतिनिधी :** पांचाळ सोनार समाज श्रावणी संघटना पारगांव खंडाळा ( जि. सातारा ) यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील कार्याचा देण्यात येणारा या वर्षीचा मानाचा,श्रावणी रत्न पुरस्कार, सोलापूर सोनार समाज संस्थेचे उपाध्यक्ष आणि सेवा निवृत्त नायब तहसीलदार श्री. विजयकुमार पोतदार यांना दि. २१ एप्रिल रोजी प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या बहुमोल योगदानाची दखल घेत एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले. श्री. विजयकुमार पोतदार यांनी महसूल विभागात प्रदीर्घ काळ यशस्वी सेवा बजावली आहे. शासकीय सेवेत असतानाही त्यांनी समाजाप्रती असलेली बांधिलकी कायम जपली. निवृत्ती नंतर त्यांनी सोलापूर सोनार समाज संस्थेच्या उपाध्यक्ष पदाची धुरा सांभाळताना समाजातील विशिष्ट घटकासाठी विधायक कामे केली आहेत. पोतदार यांच्या कार्याची व्याप्ती मोठी असून यापूर्वीही त्यांना अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार, आचार्य बाळशास्त्री जांभेकर संस्था नाशिक, राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार अपूर्वा ज्ञानपीठ मुंबई, रोटरी क्लब सोलापूर यांच्या वतीने मिळालेला विशेष गौरव पुरस्कार. पारगांव खंडाळा येथील सोहळ्यात उपस्थितानी पोतदार यांच्या प्रशासकीय शिस्त आणि सामाजिक तळमळी चे कौतुक केले. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## डॉ. अभिलाषा दयानंद ठाकूर यांचा एमबीबीएस पदवीदान सोहळा उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** येथील एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगर मधील दयानंद ठाकूर व सौ. बबिता ठाकूर या विद्यार्थीप्रिय शिक्षक दांपत्याची ज्येष्ठ कन्या डॉ. अभिलाषा दयानंद ठाकूर हिने नुकतेच एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले असून तिचा पदवीदान सोहळा नुकताच मुंबईत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

डॉ.अभिलाषा ही शालेय जीवनापासूनच अभ्यासप्रिय विद्यार्थिनी म्हणून ओळखली जायची. नियमित अभ्यास आणि सातत्याच्या बळावर आपले शालेय देशिकेंद्र विद्यालयातून तर व महाविद्यालयीन शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालयातून घेतले आहे. त्यानंतर तिने लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज सायन, मुंबई येथून एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. डॉ. अभिलाषाचे आजोबा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अजनी ( बु.) येथील प्रगतशील शेतकरी आहेत. आपल्या तिन्ही मुलांना त्यांनी अत्यंत कर्तृत्ववान बनवले असून आता पुढील पिढीत त्यांची नात एक यशस्वी डॉक्टर म्हणून रुग्णसेवा समाजसेवा करण्यास सज्ज झाली आहे.

हा पदवीदान सोहळा चेंबूरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी दयानंद ठाकूर, सौ. बबिता ठाकूर, श्रीमती सुनंदा कदम, सोपान यादवराव ठाकूर, आशुतोष ठाकूर, अभिषेक ठाकूर, राजनंदनी सोपान ठाकूर यांची उपस्थिती होती. डॉ.अभिलाषा हिच्या यशाबद्दल कुटुंबियांसह समाजातील सर्वच स्तरातून तिचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित
# 'युवाशक्ती जागर मोर्चा'या राज्यव्यापी दौऱ्याचा शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू - रविंद्र चव्हाण, भाजपा प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवाशक्ती जागर मोर्चा'या राज्यव्यापी दौऱ्याचा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतून दणक्यात शुभारंभ झाला. यामुळे राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू झाल्याचे उद्गार भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काढले.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे







व्यासपीठावरील सर्वात युवा मनाचे आणि ऊर्जावान नेतृत्व असल्याचे नमूद केले. आपल्या मनोगतात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, ''भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राबवण्यात येणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे. केंद्र व राज्य सरकारने तरुणाईसाठी घेतलेले लोककल्याणकारी निर्णय या यात्रेच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यातील युवकांपर्यंत पोहोचवले जातील. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले सक्षम आणि प्रभावी युवाशक्तीचे संघटन उभारणे, हेच या यात्रेचे मुख्य ध्येय आहे.''

'जागर युवाशक्तीचा, सशक्त राष्ट्रनिर्मितीचा'हा संदेश देणारी ही यात्रा राज्यातील युवकांना एकत्र आणत त्यांना विकास, नवकल्पना आणि राष्ट्रहिताच्या विचारांशी जोडण्याचे कार्य करणार आहे. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वात ही यात्रा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार असून, युवकांमध्ये जागर निर्माण करून त्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीची जाणीव करून देईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास मंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे, मंत्री नितेश राणे, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, भाजपा प्रदेश सरचिटणीस व भाजयुमो प्रदेश प्रभारी सुनील राणे, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्यासह इतर मान्यवर, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

## रेणा सहकारी साखर कारखान्यात संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सहकार प्रशिक्षण शिबीर संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** रेणा सहकारी साखर कारखाना स्थळावर २२ एप्रील २०२६ रोजी मा.संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता सहकार प्रशिक्षण केंद्र, लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण शिबीराचे कार्यकारी संचालक श्री. बी.व्ही.मोरे व खातेप्रमुख व इतर मान्यवरांचे शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले.

कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. बी.व्ही.मोरे यांनी प्रस्तावना केली त्यानंतर प्रशिक्षण शिबीरास सुरुवात होवुन श्री. ए.एस. शिंदे, निवृत्त अधिकारी ,महाराष्ट्र राज्य सह.संघ यंचे कार्यालयीन व्यवस्थापन व व्यवस्थापकीय व्यवस्थापन व संस्थेने जतन करावयाचे रेकॉर्ड, कारखाना कर्मचारी यांच्या जबाबदारी, त्यानंतर श्री. आर.बी.बरमदे, सचिव, रेणा साखर यांचे () आर्टीफिशीयल इंटेलीजन्स चा दैनंदिन कामकाजात वापर व श्री. एस.एस. शेख यांनी ताण-तणाव व्यवस्थापन व व्यक्तीमत्व विकास या विषयावर अमुल्य मार्गदर्शन केले. तर प्रशिक्षण शिबीराचे समारोप प्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन ॲड.श्री. प्रवीण पाटील यांनी सहकार क्षेत्रा बाबत सखोल माहीती दिली. ज्यांनी ज्यांनी या सहकार क्षेत्रासाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या त्यांच्या आठवणीना उजाळा देवून यापुढे ही असे प्रशिक्षणाचे आयोजन कारखान्याचे वतीने करण्यात येतील असे सांगीतले शेवटी कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर (देशमुख) यांनी ही याप्रसंगी सहकार क्षेत्रामध्ये काम करत असताना सहकारी प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातुन सहकार क्षेत्र टिकवण्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. या लातूर जिल्हयामध्ये जी काही सहकारी चळवळ ज्यांच्यामुळे चालु आहे असे सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांचेमुळे सुरु आहे असे यावेळी नमुद केले तसेच या सहकारी प्रशिक्षणाच्या माध्यमातून संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांना नक्कीच मदत होईल असे प्रतिपादन केले.

त्यानंतर समारोप कार्यक्रमात सहकार प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वाटप कारखान्याचे चेअरमन श्री. अनंतराव ठाकुर (देशमुख), व्हा.चेअरमन, ॲड. श्री.प्रवीण पाटील, संचालक तुकाराम कोल्हे, शंकरराव पाटील, नरसिंग इंगळे,सौ. अमृताताई स्नेहलराव देशमुख, सौ.वैशालीताई पंडीतराव माने, बालाजी हाके, स्नेहलराव देशमुख कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे, श्री. जी.ए.जाधव, उपप्राचार्य, सहकार प्रशिक्षण केंद्र, लातूर श्री. ए.जी. रसाळ, सहकार प्रशिक्षण केंद्र, लातूर या मान्यवरांचे शुभहस्ते करण्यात आले. सदरचे प्रशिक्षण शिबीरास कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. ए.जी. रसाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. बालाजी हाके यांनी मानले.

## मान्सुनपुर्व नालेसफाई मोहीम



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर महानगरपालिका, स्वच्छता विभागामार्फत दि.०५.०४.२०२६ पासून शहरातील मान्सूनपुर्व नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आले असून शहरातील मोठे व छोटे नाले जे.सी.बी मार्फत काढून काढण्यात आलेला कचरा उचलून घेण्याची कार्यवाही चालू असून आजतागायत ४ मोठे नाले व २० छोटे नाले जेसीबी मार्फत काढून कचरा उचलण्यात आला आहे.

तसेच आज दि.२३.०४.२०२६ रोजी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी मान्सून पुर्व नाले सफाईच्या कामाची पाहणी प्रभाग क्रमांक ०४ मधील इस्लामपुरा झोपडपट्टी तसेच इस्लामपुरा काझी यांच्या शेतातील कच्चा नाला व रिंग रोड, सम्राट चौक, डि-मार्ट परीसराची पाहणी केली. पाहणी दरम्यान मान्सून पुर्व नाले सफाईच्या करावयाच्या उपाय योजनेबाबत संबंधीताना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

# दयानंद कला महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथालय भेट; विद्यार्थ्यांत वाचन संस्कृतीला चालना

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक पुस्तक दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांच्या पुढाकारातून उत्साहात पार पडला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ग्रंथालयाशी त्यांचा अधिक जवळचा संबंध प्रस्थापित करणे हा होता.

दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक पुस्तक दिन हा दिवस वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. २३ एप्रिल हा दिवस विल्यम शेक्सपियर, आणिइंका गार्सिलासो दे ला वेगा यांसारख्या महान साहित्यिकांच्या स्मृतीशी संबंधित असल्यामुळे या दिवसाचे विशेष महत्त्व आहे.

ग्रंथालय भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिके यांची माहिती देण्यात आली. तसेच ग्रंथालयातील उपलब्ध सुविधा, वाचन पद्धती आणि संदर्भ शोधण्याच्या तंत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध पुस्तकांचे अवलोकन केले आणि वाचनाविषयी आपली आवड व्यक्त केली.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत, ''वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची किल्ली असून ज्ञान, विचारसंपदा आणि सर्जनशीलता वाढविण्याचे प्रभावी साधन आहे,'' असे सांगितले. विद्यार्थ्यांनी दररोज थोडा वेळ वाचनासाठी द्यावा आणि ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांनी उत्कृष्ट वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष पारितोषिक जाहीर केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा अधिक वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. दिनेश जोशी, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. मनोज गवरे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. अपर्णा पसाररकर, श्रीकांत जोशी आणि गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची





गोडी निर्माण होऊन ज्ञानार्जनाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## चन्नबसवेश्वर फार्मसीत ५१ रक्तदात्यांचे रक्तदान



**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे दि. २२ एप्रिल २०२६ रोजी माऊली रक्तपेढी, लातूर यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून गरजू रुग्णांच्या जीवितासाठी मोलाचे योगदान दिले.

महाविद्यालयाच्या वतीने माऊली रक्तपेढीच्या संपूर्ण पदाधिकारयांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भीमाशंकर हुच्चे यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने ''रक्तदान करा आणि खरे हिरो बना'' असे आवाहन केले.

या शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. संजय थोंटे व डॉ. अविनाश टेकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच माऊली रक्तपेढी, लातूरचे जनसंपर्क अधिकारी श्री. बालाजी जाधव, नॅक समन्वयक डॉ. ओमप्रकाश भुसनुरे व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. अनंत देशपांडे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सदरिल कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. महेश मानके, प्रा. वसीम काझी, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, शिवहार विभूते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी, विशाल निलंगेकर, विजयकुमार उपासे, सिद्धांत बिडवे, सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा हाहाकार; वीज पडून एकाचा मृत्यू, नागरिकांनी सतर्क रहावे

**धाराशिव (शेख अंजुम)–** जिल्ह्यात आज संध्याकाळपासून निसर्गाचा कोप पाहायला मिळाला आहे. अनेक भागांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीत वीज पडून एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटनाही समोर आली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, प्रशासनाने पुढील काही दिवसांसाठी हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा वादळ, जोरदार वारा, पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबाची योग्य ती काळजी घ्यावी, ज्या भागात शेतीचे किंवा मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणी उद्या सकाळपासूनच पंचनामे करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. नुकसानीचा आढावा घेऊन पुढील कायदेशीर आणि शासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण केली जाईल.

पुढील काही दिवस हवामान प्रतिकूल राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी विनाकारण बाहेर पडणे टाळावे आणि हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या स्वतःची आणि कुटुंबातील सदस्यांची काळजी घ्यावी. अशा प्रकारच्या नैसर्गिक संकटात सर्वांनी जागरूक राहून सुरक्षित रहावे ही कळकळीचे विनंती आहे.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे ३५ विद्यार्थ्यांचे पोलीस भरतीमध्ये यश

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या पोलीस भरती मध्ये ३५ विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य श्री बाळासाहेब शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख होते.

यावेळी श्री बाळासाहेब शिंदे म्हणाले की,भविष्यामध्ये आपणाला जो पगार मिळणार आहे तो जनतेच्या करातून मिळणार आहे.याची जाणीव ठेवून समाजसेवा करा. त्याचबरोबर शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यामुळे आपण या पदापर्यंत पोहोचू शकला याची सुद्धा जाणीव कायम आपल्या मनामध्ये ठेवा.अशा प्रकारचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

यावेळी डॉ.संदीप देशमुख म्हणाले की , महाविद्यालयामध्ये येत्या काळात आम्ही पोलीस भरती करिता विशेष प्रशिक्षण केंद्र सुरू करणार आहोत. याचा फायदा ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना नक्कीच होणार आहे. यातील काही विद्यार्थी केवळ भरती झाले नाही तर त्यांनी त्या त्या विभागात प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान देखील मिळविला आहे. त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने मी मनापासून अभिनंदन करतो आणि हे महाविद्यालय तुमचेच आहे. महाविद्यालयाच्या विकासामध्ये भर घालण्यासाठी आपण आपले विचार केव्हाही येऊन आम्हाला सांगू शकता. असे ते यावेळी म्हणाले.

यावेळी डॉ. संदीप देशमुख यांनी देखील विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने करण्यात आले होते. यासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी पक्षाचे समन्वयक डॉ .मंगेश भोसले यांनी परिश्रम घेतले.

भरती प्रक्रियेत महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि स्पर्धा परीक्षा विभाग यांचा विद्यार्थ्यांना फायदा झाला. या राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे प्रमुख प्रो.डॉ. केशव क्षीरसागर व स्पर्धा परीक्षा प्रमुख डॉ . मारुती अभिमान लोंढे यांचे देखील प्राचार्यांनी कौतुक केले.

भरती झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आकाश अण्णा कोळगे याने धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला तर महिलांमधून अंकिता मोहन यादव या विद्यार्थिनीने धाराशिव जिल्ह्यातील प्रथम क्रमांक मिळवला.

यावेळी विजय गायकवाड,दिनेश गायकवाड , गणेश गायकवाड, रोहित घोडके,शितल पवार,कल्याणी मिसाळ,अंकिता यादव, उमर शेख,आकाश कोळगे ,सागर पराडे इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे

सूत्रसंचालन डॉ.अरविंद हंगरगेकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ .बी डब्ल्यू गुंड यांनी केले तर आभार प्रा. माधव उगिले यांनी मानले.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी व भरती झालेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# प्रत्येक घरात नळ,प्रत्येक कुटुंबात समाधान: जल जीवन मिशनची दमदार वाटचाल

*** जलजीवनच्या ३३८ योजना पूर्ण * २ लक्ष ६४ हजार नळजोळणी**
*** यंदा एप्रिलपर्यंत विहीर अधिग्रहण/टँकरचे प्रस्ताव नाही**




धाराशिव दि.२३ एप्रिल (जिमाका) ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या जल जीवन मिशन योजनेला जिल्ह्यात प्रभावी गती मिळताना दिसत आहे.हर घर जल हा ध्यास समोर ठेवून प्रशासन आणि ग्रामस्थांच्या सहभागातून या योजनेची अंमलबजावणी होत असून,अनेक कुटुंबांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (जल जीवन मिशन) अंतर्गत जिल्ह्यामध्ये सर्व वर्गवारीच्या एकुण ५९४ योजना मंजुर असुन त्यापैकी ५९३ योजनांना कार्यारंभ देण्यात आलेले असुन ३३८ योजना पुर्ण झालेल्या असुन उर्वरीत २५५ कामे प्रगतीत आहेत.

जलजीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत नळजोडणीचे एकुण उद्दिष्ट २ लक्ष ८८ हजार ५५९ निश्चित करण्यात आले होते, त्यापैकी २ लक्ष ६४ हजार २७४ इतके नळजोडणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याची टक्केवारी ९१.५८ इतकी आहे.

एकुण २०१ योजना सुधारीत मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्याचे उदिष्ट असुन त्यापैकी शासनास सादर केलेल्या सुधारीत मान्यतेपैकी १२० योजनांना मान्यता मिळालेली असुन शासनाकडे ४८ प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले आहेत.अदयाप ३३ प्रस्ताव सादर करणेसाठी प्रस्तावीत आहे.जानेवारी ते एप्रिल २०२६ अखेर विंधन विहिर अधिग्रहण/खाजगी पाण्याचे टँकर कोणताही प्रस्ताव आलेला नाही.

या योजनेमुळे विशेषतः ग्रामीण महिलांचा पाण्यासाठी होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, वेळेची बचत होऊन त्यांना इतर उपयुक्त कामांसाठी वेळ देता येत आहे.तसेच सुरक्षित पिण्याच्या पाण्यामुळे आरोग्यदायी जीवनशैलीकडेही ग्रामस्थांचा कल वाढताना दिसतो आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या कार्यालयाकडून ही कामे वेगाने सुरू असून,उर्वरित कामेही लवकर पूर्ण करण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे.जल जीवन मिशनच्या माध्यमातून पाणी हेच जीवन या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न धाराशिव जिल्ह्यात यशस्वीपणे होत असल्याचे चित्र आहे.

# मंत्रोच्चारात नृसिंह मंदिरात नवरात्रोत्सवास थाटात प्रारंभ: तेरमधील मंदिरात उत्सव, वेदघोषांच्या निनादात पूजा -अर्चा

तेर(प्रतिनिधी)–धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुरातन श्री लक्ष्मी नृसिंह मंदिरात मंत्रोच्चाराच्या वातावरणात नवरात्र महोत्सवास बुधवारी उत्साहात प्रारंभ झाला. सकाळपासूनच मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून, भाविक भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. पारंपरिक विधी, पूजा-अर्चा आणि वेदघोषांच्या निनादात महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. तेर येथील श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर हे ऐतिहासिक व हेमाडपंथी शैलीतील प्राचीन मंदिर म्हणून ओळखले जाते. पिप्पीलिका ओढा आणि तेरणा नदीच्या संगमावर वसलेले हे मंदिर स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. मंदिराला पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चारही दिशांना उपशिखरे असून, मध्यभागी एक मुख्य शिखर आहे. या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे मंदिराची भव्यता अधिक उठून दिसते. परिसरातील भाविकांसह दूरवरूनही श्रद्धाळू येथे दर्शनासाठी येतात.

या मंदिरात श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रेनिमित्त मुख्य काल्याचा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने पार पडतो. तसेच श्री नृसिंह जयंती दिवशी उटी लावून अलंकार घालण्याची प्रथा आहे. या वेळी मंदिरात विशेष सजावट केली जाते. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दर शनिवारी, पौर्णिमेला, श्रावण महिन्यात तसेच श्री लक्ष्मी नृसिंह नवरात्र महोत्सवाच्या काळात भाविकांची विशेष गर्दी होत असते. २२ एप्रिल रोजी सुरू झालेल्या या नवरात्र महोत्सवात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळ-संध्याकाळ आरती, कीर्तन, भजन, अभिषेक तसेच विशेष पूजाविधी होणार असून परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. महोत्सव काळात मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली असून भाविकांसाठी व्यवस्थाही करण्यात आली आहे. भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत असून तेर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# भीम जयघोषाने धाराशिव नगरी दणाणली

## बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या वतीने भव्य मिरवणूक काढून महामानवास अभिवादन

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- विश्वभूषण, बोधिसत्व, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२२) सायंकाळी पारंपारिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती आणि हभप, भन्तेजी, मौलानांसह अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांच्या सहभागाने मिरवणुकीचा उत्साह अधिकच वाढला.

गेल्या २५ वर्षांपासून अठरापगड जाती-समूहांना एकत्रित करत बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी जयंती उत्सव समिती अध्यक्षपदाचा बहुमान सर्व जाती-धर्मातील व्यक्तींना दिला आहे. शहरातील क्रांती चौक भीमनगर येथे जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, जयंती समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे, समितीचे अध्यक्ष तथा सांजा गावचे सरपंच प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, विशाल शिंगाडे, जातमुक्त गाव करणारे सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, मसूद शेख ॲड. परवेज काझी, पंकज काटे, बार्शीचे उद्योजक सुनील भराडीया, मौलाना अय्युब कासमी, मौलाना मुफ्ती रहेमतुल्ला, मौलाना जाफर खानसाब, मौलाना सजीयोद्दीन शेख, मौलाना कारी कलीमसाब, भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते कमल धम्मो, भन्ते संघदूत, भन्ते विनीत धम्म, भन्ते सुमित बोधी, हभप प्रकाश बोधले महाराज, हभप धनंजय महाराज सांजेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून त्रिशरण व पंचशील घेण्यात आले.

कार्यक्रमात मनोज जरांगे पाटील यांचा शाल, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान उपस्थित मौलाना, भन्तेजी, हभप यांच्या हस्ते करण्यात आला. तर सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे पाटील, अधीक्षक अभियंता संजय आडे यांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला.

प्रास्ताविकात समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे यांनी उत्सव सोहळ्याची पार्श्वभूमी विशद करून संघटनेमार्फत आयोजित करण्यात येणार्या सामाजिक कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच



मनोज जरांगे पाटील यांनी दलीत बहुजन समाजाचे नेतृत्व करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.यावेळी मसूद शेख, समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांनीही मनोगत व्यक्त केले.

आशीर्वचन मार्गदर्शन हभप प्रकाश महाराज बोधले, मौलाना जाफर महंमदअली खान, भन्ते सुमेधजी नागसेन यांनी केले. जातमुक्त गाव संकल्पनेचे प्रेरणास्थान शरद आरगडे पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

**अन्यायाची जाणीव झाली तर अन्याय दूर होईल – मनोज जरांगे पाटील**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्माचा आदर केला. त्यांच्याच विचाराचा वारसा घेऊन मी समाजासाठी मैदानात उतरलो आहे

समाजातील सर्व घटकांमी आपल्यावरील अन्यायाची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी संघर्ष केला तर अन्याय दूर होईल. आपल्यावर झालेल्या अन्यायाला दूर करायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या लढ्याची जाणीव आपण करून घ्यावी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीचे निवेदक दौलत निपाणीकर यांनी तर आभारप्रदर्शन समितीचे कार्याध्यक्ष सुधीर पवार यांनी केले.

क्रांती चौक भीम नगर येथून शिस्तबद्धपणे, पारंपारिक वाद्यांच्या गजरात निघालेली ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महापुरुषांना अभिवादन करून परत क्रांती चौक येथे विसर्जित करण्यात आली. या मिरवणुकीने सर्व धाराशिवकरांचे लक्ष वेधले. मिरवणुकीसाठी बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डीएस ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649